VOL- XI | ISSUE- III | MARCH | 2024 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 8.02 | ISSN 2349-638x

# लेखकाचा अभ्यास, अध्ययन आणि अध्यापन

**प्रा.डॉ.सौ वंदना विनायक नढे**
मराठी विभाग प्रमुख
श्री शिवछत्रपती महाविद्यालय,जुन्नर
ईमेल- drnadhevv@gmail.com

**प्रास्ताविक : -**

लेखकाचा अभ्यास अध्ययन आणि अध्यापन या दोन भिन्न संकल्पना आहेत सर्वप्रथम **अध्ययन** म्हणजे काय ? ते पाहू.

**अध्ययन** म्हणजे एखाद्या विषयाचा अभ्यास स्वत:साठी करणे किंवा स्वतः आधी तो अभ्यास समजून घेणे, स्वतः आकलन करून घेणे, हे होय तर

**अध्यापन** म्हणजे दुसऱ्याला तो विषय समजावून देणे. सोप्या भाषेत त्या विषयाचे स्पष्टीकरण देणे, त्या विषयाची आवड निर्माण करणे म्हणजेच काय तर आधी स्वतः शिकणे नंतर दुसऱ्याला शिकवणे.

**लेखक** म्हणजे काय ?

1. जो लेखन करतो
2. जो प्रतिभा शक्तीच्या जोरावर नवीन कथानक किंवा विषय घेऊन वेगळी कलाकृती निर्माण करतो.
3. जो आपल्या लेखनाने वाचक आणि अभ्यासकाला विषयाची आवड निर्माण करतो.

असा हा लेखक अभ्यासताना

1. तो लेखक लेखन करण्यास कसा प्रवृत्त झाला ?
2. तो कोणत्या जातीव्यवस्थेचा प्रतिनिधित्व करतो का?
3. ज्या गावात किंवा भागात वाढला, घडला त्या पर्यावरणाचा, परिस्थितीचा त्याच्यावर काय परिणाम झाला ?
4. कोणत्या धार्मिक, सामाजिक, राजकीय घटना त्याला लेखन करण्यास कारणीभूत ठरल्या ?
5. कोणत्या नैसर्गिक आपत्तीचा प्रश्न तो मांडतो किंवा त्याला ते मांडावेसे वाटले?
6. भाषिक विशेष
7. कौटुंबिक परिस्थिती
8. समकालीन लेखकाच्या प्रभावातून स्वतःच्या लेखन करण्यास प्रवृत्तझाले का?
9. कायदे, जागतिकीकरण इत्यादी नवीन योजनांचा प्रभाव.
10. लेखनास परिवर्तनाची परिस्थिती.
11. दोन पिढ्यांमधील विचारातील बदल.
12. बेकारी, उपासमारी, उदरनिर्वाहासाठीची सोय

या सर्व गोष्टींचा विचार करून लेखकाचे जीवन लेखनाद्वारे अभ्यासले गेले पाहिजे.

तसे पाहता साहित्य हा मानवी जीवनानुभवाचा सहज, सुंदर अविष्कार असतो. या अविष्कारात उत्कटता, काव्यात्मकता व काळाची वेध घेण्याची क्षमता तसेच मानवी जीवनजाणिवा समृद्ध करण्याची क्षमता असते. त्यामुळे या संवेदनशील कलावंताचे भावविश्व व त्याचा परस्पर अनुबंध शोधला पाहिजे.

**लेखनामागची प्रेरणा :-**

लेखनासाठी लेखकाला एखादी प्रेरणा प्रवृत्त करणारी असते. तिचा शोध घेतला पाहिजे.

**कालखंड :-**

दोन वेगवेगळ्या भाषेतील लेखक किंवा दोन समकालीन लेखक ह्यांचा अभ्यास करताना कोणत्या काळातील लेखक आहे, त्या काळाचा त्या लेखकाच्या जीवनावर समग्र परिणाम होत असतो. काळाचे संस्कार लेखकावर होतात. त्यातून त्याचे आपले अनुभवविश्व समृद्ध होत असते. त्या-त्या काळातील विचारप्रवाहांचे, समजुतींचे

राजकीय, सामाजिक, धार्मिक परिस्थितीवर त्या लेखकाच्या लेखनाचा परिणाम होत असतो. सामाजिक परिस्थितीप्रमाणे लेखकाच्या काळातील वाङ्मयीन परिस्थितीही महत्त्वाची ठरते. त्या काळात वाङ्मयीन पर्यावरण नेमके कोणत्याही लेखकाचे साहित्य त्या त्या काळचे काही विशिष्ट संस्कार घेऊन येत असतात, त्याचाही अभ्यास केला गेला पाहिजे.

लेखकाचा अभ्यास करताना मुद्दे साधार, पुराव्यानिशी मांडले पाहिजेत. लेखकाच्या कोणत्याही साहित्यकृती बद्दल मत व्यक्त करताना योग्य तो संदर्भ पुरावा देणे, महत्त्वाचे असते. म्हणून लेखकाच्या साहित्यातील गुणदोषांची चर्चा संशोधकांने संदर्भासहित केली पाहिजे. एक लेखक अनेक वाङ्मय प्रकाराचे लेखन करू शकतो, म्हणून त्या त्या विविध कलाकृतीतील विभिन्न अनुभवांचे त्या त्या साहित्यप्रकारानुसार त्या त्या कलाकृतीनुसार मूल्यमापन केले पाहिजे. म्हणून लेखकाच्या लेखन निर्मितीतील चढ-उतार हेरून तिचे नेमकेपणाने विवेचन केले पाहिजे. लेखकाच्या आशय आणि अभिव्यक्तीतील भिन्नता शोधून त्यातून होणारे एक समान सूत्र लक्षात घेतले पाहिजे.

लेखकाची प्रतिभा, त्याचे विचार, संस्कार, त्याला लाभलेली परिस्थिती यांच्या विविधांगी प्रभावातून लेखनकर्ता साकार होत असतो, म्हणून विशिष्ट लेखकाचा अभ्यास करताना त्याच्या संपूर्ण साहित्यकृतीचा चिकित्सक अभ्यास करून त्याच्या साहित्यकृतीचे वाङ्मयप्रकारानुसार वर्गीकरण करून त्यांची वाङ्मयीन गुणवत्ता लक्षात घ्यावी लागते. लेखकाचे संपूर्ण जीवन किंवा लेखन लक्षात घेऊन लेखकाचे व्यक्तिमत्त्व, जीवनदृष्टी व लौकिक व्यक्तिमत्त्व व वाङ्मयीन व्यक्तिमत्व व त्यांचे स्वरूप व परस्परसंबंध लक्षात घ्यावी लागतात.

जे लेखक आपण अभ्यासणार त्याने हाताळलेल्या वाङ्मय प्रकाराचे सखोल व सर्वांगीण ज्ञान लेखक निवडीच्यावेळी असणे आवश्यक आहे. तसेच लेखकाने निवडलेल्या वाङ्मय प्रकार आपल्या आवडीचा नसेल तर आपल्याला तो विषय नावडता वाटेल. उदा. विजय तेंडुलकर यांचा नाटककार म्हणून अभ्यास

आपण निवडलेल्या लेखकाच्या समकालीन लेखकांचाही अभ्यास करावा लागतो. उदा. लेखक र.वा. दिघे अभ्यासताना समकालीन वाङ्मयीन प्रवाह किंवा मराठी कादंबरीची परंपरा व लेखक इ.चा विचार करावा लागतो. एखादा लेखक अभ्यासताना त्याचे काही पैलू प्रकाश जोतात आले नाही तर ते समोर आणणे महत्त्वाचे असते. आपण निवडलेल्या लेखकाबाबत काही नवीन सांगता आले तरच तो विषय निवडावा अन्यथा तो विषय घेऊ नये.

लेखकाच्या ऐतिहासिक दृष्टिकोनातून अभ्यास करताना त्याचा व काळाशी असलेला अनोन्यसंबंध किंवा नाते अभ्यासणे महत्त्वाचे असते. उदा. ज्ञानेश्वर व काळ, त्यावेळचा व याचबरोबर आजही ज्ञानेश्वरांचे असलेले महत्त्व अभ्यासणे, गरजेचे आहे.समकालीन भाषाभ्यास, रूढी-परंपरा, सामाजिक वातावरण यांचाही उलगडा करावा लागतो.

कलाकृतीही एका विशिष्ट समाजाचे अपत्य असते. वातावरण व समाज यांचा लेखकाच्या वाङ्मयीन लेखनावर परिणाम होत असतो. या दृष्टीने केलेले मूल्यमापन हे लेखकाच्या काळातील आर्थिक, सामाजिक व राजकीय इ. विचार केलेला असतो.

दोन लेखकांमध्ये समान गुणधर्म शोधून तौलनिक विचार करावा लागतो लेखक व त्याचे चरित्र यांच्यातील संबंधांचा अभ्यास तसेच लेखकाच्या वाङ्मय प्रकारातील किंवा लेखनातील एखादे तत्त्वज्ञान, कल्पना, विचार यांचाही अभ्यास करावा लागतो.

थोडक्यात---- लेखकाचा अभ्यास एक प्रकारे त्याच्या मनाचा, समस्यांचा व साकल्याने वाङ्मयीन जीवन प्रवासाचा, व्यक्तिमत्त्वाचा व कर्तृत्वाचा शोध असतो तो कधीही संपत नाही.

**संदर्भग्रंथ—**

1 साहित्य संशोधन : वाटा आणि वळणे, सुधाकर शेलार, अक्षर वाङ्मय प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती 13 जून 2019, पृ. 61
2 मराठी साहित्य संशोधन : नव्या दिशा, डॉ. अविनाश आवलगावकर, प्रतिमा प्रकाशन, प्रथमावृत्ती नोव्हें. 2006 पृ.120
3 संशोधन क्षेत्रे आणि पद्धती, डॉ. जयश्री पाटणकर,शब्दालय प्रकाशन,श्रीरामपूर, प्रथमावृत्ती, 2010,पृ.68.
4 संशोधन : सिद्धांत आणि पद्धती, डॉ. सदा कऱ्हाडे, लोकवाङ्मयगृह, मुंबई, द्वितीय आवृत्ती मार्च 2007. पृष्ठ 107
5 संशोधन : स्वरूप आणि व्याप्ती, संपा. डॉ. भास्कर शेळके, शब्दश्री प्रकाशन,जुन्नर,प्रथमावृत्ती2013, पृ.119